म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५९५



REFBK-0025919

# ऋतुचित्र : शिरीष पै

संदर्भ काव्य

संदर्भ काव्य
२५६५
२५६९८
३०।५।८९

# ऋतुचित्र





# ऋतुचित्र

शिरीष पै

REFBK-0025919

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

ऋतुचित्र
पॉप्युलर प्रकाशन
(म ५२४)
© शिरीष पै
प्रेम शोभा,
केळुस्कर मार्ग (उ.),
शिवाजी पार्क,
दादर, मुंबई ४०० ०२८.
पहिली आवृत्ती १९८८/१९९०
प्रकाशक :
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, पं. मालवीय रोड,
ताडदेव, मुंबई ४०० ०३४
मुद्रक :
रमा बुक बाइंडिंग हाऊस
सी-११४, ओखला इंडस्ट्रियल इस्टेट,
फेज-I
नवी दिल्ली ११० ०२०
छायाअक्षरजुळणी :
टाइप फोटो,
वडाळा, मुंबई ४०० ०३१
मुखपृष्ठ आणि अंतर्गत सजावट :
अरुंधती वर्तक
काव्य परिचय :
विजया काळे
मांडणी :
वसंत सोपारकर

शशी आणि चित्रा
अलौकिक आणि श्रीमा
ह्यांना



# ऋतुचित्र

## पावसाच्या कविता

# पावसाच्या कविता


१. मला नव्हते वाटले
२. रिमझिम रिमझिम
३. दडी मारून बैसला
४. वाट पाहून शेवटी
५. ढग कभिन्न काजळी
६. भगवंता तुझ्याकडे
७. दयावंत भगवंत
८. खुळ्या खुळ्या हे पावसा
९. किती असह्य झालास
१०. असा सुंदर सावळा
११. अहा नाजुक केवढा
१२. थोडी थोडी रिपटिप
१३. पहाटेच्या शांत वेळी
१४. काळा ढग आभाळात
१५. झाडे डुलाया लागली
१६. थंडगार पावसाचा
१७. आज लागे ना चाहूल
१८. वाट चुकून पाऊस
१९. केव्हापासून सावळा
२०. कोसळतो रात्रभर
२१. ऊन सोनेरी सोज्वळ
२२. गच्च भरले आभाळ
२३. गेला पडून पाऊस
२४. ऊन आले तेवढ्यात
२५. मेघ अजस्त्र पांढरे
२६. एकसारखी उन्हात
२७. लखलखतात परी
२८. उभा पावसाळा गेला
२९. आज सकाळपासून
३०. नाही उजाडले तोच
३१. अभ्रे दाटली नभात
३२. पहाटेला काळा,काळा
३३. मंद गुलाबी आकाश
३४. काल होतास पावसा
३५. नको नको रे पावसा
३६. आता थोडा थोडा येतो
३७. तुला देताना निरोप



## १

मला नव्हते वाटले
असा येईल पाऊस
माझी कित्येक जन्माची
अशी पुरवील हौस

पाने तरारली सारी
लाख अंकुर फुटले
पाणी झेलता मातीला
नको नकोसे जाहले

बीजाबीजात सळाळे
कोंब नव्या जीवनाचा
माझ्या आत्म्याने भोगील
शाप पुन्हा जगण्याचा

## २

रिमझिम रिमझिम
शुभ्र पडतो पाऊस
जाईजुई सायलीची
जशी सांडते आरास

भिजू... भिजू का जराशी
मीच मला विचारले
जरा जरा भिजताना
अंग सारे ओलावले

चिंब भिजता भिजता
किती क्षण आले गेले
मातीवर पावलांचे
ठसे शेकडो उठले

नाही थांबत पाऊस
धारा किती ह्या कोवळ्या
माझ्या साऱ्या पायखुणा
जशातशाच राहिल्या

## ३

दडी मारून बैसला
माझा लाडका पाऊस
धो धो कोसळला काल
आज जरा न टिपूस

कसे अगदी न आज
ढग काळे आकाशात
रान चालले तापून
रुक्ष कोरड्या उन्हात

नाही साहवत आता
पानापानात काहीली
कधी येशील पावसा
धग मातीला लागली

## ४

वाट पाहून शेवटी
माझे लावले मी दार
जर्द पिवळ्या उन्हाची
नच साहवे कट्यार


कधी येतील भरून
ढग काळे काळे काळे
कधी पिसाट सुसाट
पुन्हा सुटतील वारे

कधी तुटेल कडाड
फांदी जीर्ण वाळलेली
कधी झुलू लागतील
पाने कोवळी कोवळी

५

ढग कभिन्न काजळी
सकाळीच गोळा झाले
त्यांनी वाढता वाढता
अर्धे आभाळ झाकले

मातीवर पसरली
त्यांची राक्षसी सावली
लव कोवळ्या उन्हाची
तिने गिळून टाकली



६

भगवंता तुझ्याकडे
आज फक्त मागीतल्या
जरा चिंब करणाऱ्या
पावसाच्या धारा ओल्या

७

दयावंत भगवंत
त्याने ऐकली प्रार्थना
आज धाडली आकाशी
लक्ष ढगांचीच सेना

केव्हापासून पाऊस
पहा चौफेर सांडतो
दयावंत देवापरी
मातीलागी गोंजारीतो

हळू हळू अविरत
किती राहीला झरत
चिंब गहीवरलेला
त्याचा आवेग अत्यंत

## ८

खुळ्या खुळ्या हे पावसा
किती भिजविशी मला
नाही नाही म्हणताना
मीही कवळीले तुला

कसा वाहे गार वारा
अंग सारे थरथरे
त्यात तुझा अनावर
वरतुनी हात फिरे

कुठे जाऊ धावू कुठे
आता पुरती भिजले
धुंद धारांच्या छतात
बाई अखेरी लपले

९

किती असह्य झालास
अरे निष्ठुर पावसा
तुझे वारंवार येणे
कसे सोसू मी राजसा

एका एका भेटीतून
व्याकुळता वाढतसे
पुन्हा नव्या भेटीसाठी
नवी तृष्णा ओढतसे

आता नाही तरी पुढे
वस्ती तुझी संपणार
वर्षभर आसवात
खूण तुझी वाहणार

## १०

असा सुंदर सावळा
नव्हता पाहिला पाऊस
लेप श्यामल चंदनी
आला लेवून अंगास

काळ्या रेशमी बाहूत
त्याने घेतले धरेला
जशी येऊन भरती
लाटा काजळी उठल्या

झाडे झाली काळीभोर
रानेवने काळोखली
काळी रात पावसाची
भर मध्यान्हीला आली

## ११

अहा नाजुक केवढा
आहे पाऊस आजचा
स्वतः नाहीच दिसत
जरी पडतो केव्हाचा

फक्त मृदू रिपटिप
मातीवर जाणवते
साक्ष एवढीच त्याच्या
असण्याची निनादते

## १२

थोडी थोडी रिपटिप
थोडी थोडी उघडीप
जरा ढगाळले नभ
तोच निळे आपोआप

कधी उदास कोरडा
कधी येई खळाळत
एका वेळी पावसाळा
विरक्त नी अनुरक्त

१३

पहाटेच्या शांत वेळी
हलकेच जाग आली
पानांवर पावसाची
टिपटिप  जाणवली

हळु हळु पावसाचा
पायरव मंदावला
फक्त खोल श्वासातून
कंप मात्र कानी आला

## १४

काळा ढग आभाळात
ओथंबून राहिलेला
नाही झडत पाऊस
वारासुद्धा थांबलेला

फांद्या मुळी न हालती
पाने जरा न डोलती
पावसाच्या सागराला
आज लागली ओहोटी

## १५

झाडे डुलाया लागली
पाने जाहली कंपित
कसा झोंबतो अंगाला
तीव्र गारवा हवेत

जरा जरा मातीवर
थेंब टपटपतात
वारा सांगतो शकुन
सरी येतील वेगात

१६

थंडगार पावसाचा
वारा आला झुळकत
शहारले झाले अंग
क्षणार्धात रोमांचित

दूर दूर कुठेतरी
कोसळतो उमगले
आणि इतक्या दुरून
त्याने मला भिजविले

## १७

आज लागे ना चाहूल
जरासुद्धा पावसाची
मंद पसरे चौफेर
छटा सोनेरी उन्हाची

नाही पावसाचा ध्वनी
शांत सकाळच्या वेळी
जागलेली राने वने
पुन्हा पेंगाया लागली

## १८

वाट चुकून पाऊस
कुठे वळला वाकडा
केला कावळ्यांनी काल
कलकलाट केवढा

मात्र सारी सारी रात
धार संतत लागली
आणि कावळ्यांची चोच
पहा आज मौनावली

## १९

केव्हापासून सावळा
मेघ थांबला नभात
सुन्न दाटून मूकता
उदासले आसमंत

आता कोणत्या क्षणाला
आहे येणार पाऊस
वाट पाहता पाहता
गेला निघून दिवस

कधीतरी बेचैनीत
झोप लागता किंचित
केला सुरू पावसाने
रात्री केवढा आकांत

२०

कोसळतो रात्रभर
हल्ली सारखा सारखा
घाली धिंगाणा पाऊस
वेड लागल्यासारखा

उजाडता वेगे दूर
जरी जातसे निघून
येतो अचूक भेटीला
संधी रात्रीची साधून

## २१

ऊन सोनेरी सोज्वळ
मातीवर पसरले
पहा एकाच दिशेला
नभ मेघांनी व्यापले

परी आला न पाऊस
आता नाही का यायचा
काय वर्षल्यावाचून
मेघ माघारी जायचा

## २२

गच्च भरले आभाळ
वारा वाहे झुळुझुळु
कशी होऊन उन्मन
झाडे लागलीत झुलू

थंडी वाढत चालली
क्रमाक्रमाने हवेत
वेगे निघाला पाऊस
इथे यावया निश्चित

## २३

गेला पडून पाऊस
किती हायसे वाटले
जसे त्याच्या छातीवर
शांत मस्तक टेकले

२४

ऊन आले तेवढ्यात
भरू लागले आभाळ
ढगातून झिरपता
ऊन भासले श्यामल

पान नव्हते हलत
तोच वारा झुळुकला
स्तब्ध अबोल झाडाचा
नूर पुरा बदलला

आता असे आता तसे
जग पालटते रूप
पावसाच्या लहरीत
सामावून आपोआप

## २५

मेघ अजस्त्र पांढरे
आभाळात गोळा झाले
पाते सोनेरी उन्हाचे
अवचित लकाकले

तितुक्यात माया काळी
आली दाटून क्षणैक
हे न चिन्ह पावसाचे
कोरडीच धूळफेक

२६

एकसारखी उन्हात
भूमी चालली तापून
गमे पावसाची स्वारी
गेली मुक्काम सोडून

तोच वेगात कुठून
आला पाऊस जोराचा
आणि फेकला मातीने
गंध पहिल्या भेटीचा

## २७

खलखलतात परी
विजा नाहीत उग्रश्या
गर्जतात जरी मेघ
ध्वनी त्यांचाही सौम्यसा

पडे पाऊस थोडासा
जरा थांबून थांबून
भाग बघता बघता
गेली पाण्यात बुडून

२८

उभा पावसाळा गेला
तरी अर्धे न भरले
आज एका तडाख्यात
कसे तुडुंबले तळे

धो धो नाहून धारेत
पुरे शेवटी थकले
थेंब टपटपताना
नाही तरंग उठले



## २९

आज सकाळपासून
हवा झालेली धूसर
वेगळाच लावलेला
आज पावसाने सूर

मऊ पिसाच्या सारखा
त्याचा फिरताना हात
हवेतून उतरला
वाटे कुणी देवदूत

निळ्या निळ्या धुक्यावर
त्याची चालती पावले
टप टप पायातळी
शुभ्र गळतात फुले

उभा पावसाळा गेला
असा नव्हता कधीच
त्याचा आजचा दिवस
होता ठरला आधीच

## ३०

नाही उजाडले तोच
काळोखला आसमंत
परि पावसाचे ढग
नाही जमले ही खंत

वारा पारच पडला
पान एकही न हले
आता संपली वादळे
पूर इथले सरले

कधी येईल पाऊस
फक्त वाट पहायची
आहे येणार ठाऊक
कशी वेळ कटायची

## ३१

अभ्रे दाटली नभात
काही थेंब शिंतडले
नाही भिजली जमीन
तरी हायसे वाटले

सरू लागला पाऊस
जीव जाहला व्याकुळ
थेंब एक किंवा दोन
तेही पुरेसे होतील

## ३२

पहाटेला काळा काळा
सकाळचा जांभूळला
ढगाळून दिनभर
खिन्न धूसर राहिला

लोपताना एकाएकी
अंग उन्हात माखले
जाता जाता पावसाने
किती रंग बदलले

## ३३

मंद गुलाबी आकाश
उभा डोलतो पिंपळ
पुन्हा पुन्हा पडे कानी
कावळ्यांचा कोलाहल

थंड वाहता झुळुक
आग शमेना अंगाची
आली संपत मुदत
प्राणसख्या पावसाची

३५

काल होतास पावसा
आज झालास पारखा
तुझा उत्कट आवेग
मनी आठवे सारखा

कधीतरी क्षणभर
तुजलागी विस्मरते
कशी होते बेइमान
खंत प्राणात बोचते

## ३५

नको नको रे पावसा
पुन्हा पुन्हा आठवूस
डोळे तुडुंब पाण्याने
माझे भराया लावूस

आली निरोपाची वेळ
जीव झाला कासावीस
पुन्हा पुन्हा आठवते
कुठे कुठे भेटलास

३६

आता थोडा थोडा येतो
आणि येतो तसा जातो
जाता जाता पावसाळा
घडी घडी रेंगाळतो

नाही नाही म्हणताना
खूप पाऊस लांबला
त्याच्यासम त्याच्यासवे
त्याचा निरोप लांबला

## ३७

तुला देताना निरोप
डोळे आलेत भरून
रंग तुझा घननीळ
घेते मनी साठवून

येतानाचे घातलेले
धुंद पिसाट थैमान
घनदाट होता होता
वर्षलास शांतवून

कधी गारवा शीतल
कधी उन्मत्त वादळे
रूप नाजुक थेंबात
कधी उन्हात रंगले

किती क्षण बहुमोल
पावसा तू दिले मला
सांगशील काय सख्या
काही दिले का मी तुला

# ऋतुचित्र

## थंडीच्या कविता

# थंडीच्या कविता


१. गूढ पटल पांढरे
२. रात केवढी शीतल
३. आज उजाडले तोच
४. दूरदेशीची पाखरे
५. मध्यरात्री कशानेशी
६. किती अंधार भोवती
७. झाडातून आरपार
८. अलीकडे रात्रभर
९. ऐन दुपारचे ऊन
१०. दिसे बाग उदासीन
११. फूलपाखरांना जाग
१२. झाला सूर्यास्त परंतु
१३. जसा मध्येच ओतावा
१४. फूलपाखरांची जोडी
१५. पाठ टेकता गादीला
१६. थंडीतही सकाळीच
१७. हळु हळु हळु हळु
१८. सूर्य गेला मावळून
१९. तरंगत तरंगत
२०. उलटता मध्यरात्र
२१. वारा येताच भरारा
२२. अशा बोचऱ्या थंडीत
२३. गवताची पाती तेव्हा
२४. कधीमधी बागेमध्ये
२५. थंडी वाढता वाढता
२६. थोडा तीव्र थोडा सौम्य
२७. ऊन सोनेरी सकाळी
२८. हिवाळ्यात संध्याकाळी
२९. सौम्य सोनेरी उन्हाचा
३०. परसात जांभळाचे
३१. वारा भन्नाट सुटला
३२. किती दिसांनी पाखरा
३३. आज दुपारपासून



१

गूढ पटल पांढरे
दाटे झाडांच्या भोवती
मग्न होऊन स्वतःत
झाली अबोल पुरती

प्रतिक्षणी स्तब्धपण
त्यांचे वाढत चालले
कळे वाजाया लागली
आता थंडीची पावले

२

रात केवढी शीतल
चांद शीतल त्याहून
रस रुपेरी चालला
पानांवरती गोठून

कसा वाराही गोठला
आणि झाडे गारठली
गारव्याच्या डोहामध्ये
रात खोलात चालली

## ३

आज उजाडले तोच
थंडावले सारे काही
फक्त सुखद गारवा
कुठे हालचाल नाही

जरा पान न हालते
झाडे चिडीचूप झाली
एक निस्सीम शांतता
स्पष्टपणे ऐकू आली

## ४

दूरदेशीची पाखरे
माझ्या बागेत खेळली
शीळ घालता घालता
पहाटेला दूर गेली

एक बापुडे सकाळी
होऊनीया सैरभैर
चोच मिटून शोधते
सोबत्यांना बागभर

इवलाल्या पावलांनी
इथेतिथे डोकावले
कुठेतरी पानाआड
काकडून थबकले

५

मध्यरात्री कशानेशी
माझी झोपमोड झाली
कोर चंद्राची समोर
तोच दृष्टीला पडली

तीव्र गारवा हवेत
तेवढ्यात जाणवला
त्यातून हा चंद्ररस
अंगावर पाझरला

## ६

किती अंधार भोवती
जग दिसेनासे झाले
डोळे ताणून पाहता
काही आकार दिसले

उलटता मध्यरात्र
चंद्रताऱ्यांनी फेकला
अंधाराच्या खांद्यावर
शुभ्र रेशमाचा शेला

त्याने झाकली अलगद
झोपलेली राने वने
डोळे मिटून हळूच
झाली गिपचीत पाने

थंडी वाढत [illegible]
वारा [illegible] आला
त्याच्यासवे तरंगत
कुठे गेला चंद्रशेला

## ७

झाडातून आरपार
शुभ्र आकाश दिसते
उभ्या राईच्या भोवती
काही धूसर लोटते

हळु हळु झुळकत
कुठूनसा येतो वारा
तुटताना पानाचाही
देठ दुखतो न जरा

फूलपाखरे हिंडती
जशी पिसे वाऱ्यावरी
ऊन जरा न बोचते
आज थंडीच्या दुपारी

ऋतू आल्हाददायक
थोडा गारवा असून
जीर्ण पानांची शेकोटी
नाही पेटली अजून

# ८

अलीकडे रात्रभर
किर्रर काळोख दाटतो
जशी जशी चढे रात
पूर काळोखाला येतो

किरकिर रातकिडे
आता जरा न करती
जाग येता पाखरांच्या
चोची तशाच मिटती

खोल समाधीत झाडे
जाती श्वास थांबवून
जशी स्वप्ने झोपेतच
हल्ली जातात गोठून

९

ऐन दुपारचे ऊन
अंगावरती रेलले
वेळ थंडीची म्हणून
अशी काही सुखावले

## १०

दिसे बाग उदासीन
सकाळच्या प्रहरीला
रंग हरित देखणा
तिचा काळवंडलेला

राठ होऊनीया देठ
पाने जून जाहलीत
थर धुळीचे जमाया
त्यांच्यावर लागलेत

आज नाही पण उद्या
पाने पिवळी होतील
गळतील मातीवर
ढीग त्यांचे साचतील

फूलपाखरे जरी हा
असतील सोबतीला
तरी टळणार नाही
जीर्ण अवस्था [illegible]

## ११

फूलपाखरांना जाग
हळु हळु येत गेली
खुसमुस पानांआड
त्यांनी जराशीच केली

आता थोड्याच वेळात
ऊन सोनेरी येईल
पंख हळूच तयांचे
खुलतील मिटतील

जाळीतून एकदोन
झेप हवेत घेतील
आणि तापता दुपार
सारी सारी जागतील

पंख देखणे रंगीत
उन्हातच खुलतील
फूलपाखरे थंडीत
दुपारीच फुलतील

## १२

झाला सूर्यास्त परंतु
दिवे लागले नाहीत
जसे होऊन भ्रमिष्ट
आले पतंग घरात

कुठे कुठे भिंतीवर
पंख त्यांनी आदळले
फटीतल्या काळोखात
किती आधार शोधले

कुठे कोण कुठे कोण
गेले शांत समाधीत
थंडावले पहाटेस
काही संपूनी मुदत

## १३

जसा मध्येच ओतावा
रस सोन्याचा रुण्यात
खुले चंद्राचा कोरवा
तशा आगळ्या तेजात

काळे मखमली आकाश
कडा गुलाबी किंचित
जाळी हलते पानांची
झाडे जाहली कंपित

अंग सुखावून जावे
असा गारवा हवेत
तरी झोंबतो सारखा
खिन्न कापरा एकांत

१४

फूलपाखरांची जोडी
फुलापानात खेळते
चुंबूनीया एकमेका
क्षणार्धात दूर होते

इथे तिथे कुठे कुठे
त्यांची चालली भ्रमंती
किती घेतात चुंबून
ह्याला नाहीच गणती

## १५

पाठ टेकता गादीला
जसा समोरून आला
पीतगौर चांदुकला
अर्धामुर्धा फुललेला

न्याहाळता हरखून
डोळे मिटाया लागले
नाही कळले की मला
कधी निद्रेने वेढले

डोळे उघडले तेव्हा
जादू सारी संपलेली
थंड रिकामी पहाट
जशी गिळावया आली



## १६

थंडीतही सकाळीच
जाग बुल्बुलाला आली
टपकन मातीवर
उडी तयाने घेतली

पंख कापतात तरी
चोच मातीत टोचतो
एका सुकल्या फळाला
जसा प्राणात शोषतो

## १७

हळु हळु हळु हळु
सूर्य गेला पश्चिमेला
झुळकत झुळकत
थंडगार वात आला

ऊन सोनेरी सोनेरी
झाडांवर पसरले
पान हिरवे हिरवे
जसे आतून पेटले

फूलपाखरांचे थवे
कुठे दिसेनासे झाले
थबकले फांदीवर
फक्त उदास कावळे

## १८

सूर्य गेला मावळून
दाटे अंधार भोवती
किती जमून कावळे
दारी करकरताती

घननीळ काळोखात
घर लागले बुडाया
गेली बुजून कधीच
पिंपळाची दीर्घ छाया

हवा दमट कोमट
नाही थंडी नाही वारा
नाही अंगावर आज
आला रोजचा शहारा

## १९

तरंगत तरंगत
धुके भुईवर आले
जिथे जिथे अवसर
तिथे दाटून राहिले

जणू झाडांच्या भोवती
कुणी कापूस पिंजला
पानांवरती पानांच्या
छाया धूसर दाटल्या

रान लेवून निळाई
खोल शिरले स्वप्नात
पहा फुटली पहाट
ऐन दुपारी उन्हात

## २०

उलटता मध्यरात्र
थंडी वाढत चालली
वाट एकटी चंद्राची
अर्धी अधिक संपली

झाले निर्जन आकाश
विझे ताऱ्यांचा काफला
वाट चालताना चंद्र
दिसे जरासा थांबला

२१

वारा येताच भरारा
फांदी गद्‌गद हालली
सुकलेली जीर्ण पाने
भराभरा खाली आली


धावलीत पानांमागे
फूलपाखरे भ्रमात
आणि झाली कासावीस
एका धुळीच्या लोटात

## २२

अशा बोचऱ्या थंडीत
पहाडाची याद आली
ज्याच्या पायथ्याला एक
नदी गोठून चालली

रुंद नदीच्या जळात
गेले गोठून चांदणे
खोल दरीच्या आतून
घुमू लागलेले गाणे

कोण कड्याच्या टोकाशी
उभे एकटेच गात
पैलतीरी जाता जाता
शब्द गोठती हवेत



## २३

गवताची पाती तेव्हा
रस भरून दाटली
उभ्या अंगात येऊन
वाऱ्यावरती डोलली

आता प्रत्येक पात्याचा
झाला सुकूनीया चूर
कापे गवताचे शेत
होऊनीया पीतज्वर

## २४

कधीमधी बागेमध्ये
पक्षी अनोळखी येतो
नाचताना फांदीवर
गीत अनोळखी गातो

अवचित रोजचीच
होते नियमाने भेट
त्याची अनोळखी शीळ
झाली आता परिचित

भटकत थंडीमागे
पक्षी निघून जाईल
त्याची ओळखीची शीळ
पुढे कुणाची होईल

## २५

थंडी वाढता वाढता
थोडी थोडी कमी झाली
शुभ्र चाफ्याच्या झाडाला
कळी एक एक आली

एका फांदीच्या टोकाला
गुच्छ आला बहरून
कधी कळी झाली फूल
नाही आलेच कळून

## २६

थोडा तीव्र थोडा सौम्य
वारा गारसा वाहतो
थंडी एवढीच आज
जिने देह सुखावतो

किती साचला पाचोळा
किती पाने गेली वाया
कुठे मात्र आताशीच
फुले लागली फुलाया

## २७

ऊन सोनेरी सकाळी
पसरले झाडांवर
झुळकत तेवढ्यात
वारे आले थंडगार

टपटप खाली आली
पाने पिवळी मातीत
फांदी हालवून कुणी
जणु फुले पाडलीत

## २८

हिवाळ्यात संध्याकाळी
हवा जाहली निर्वात
एकही न हले पान
अवचित सारे शांत

पक्षी झोपले कधीच
कुठेतरी झाडांवर
गजबज चाललेली
दूर दूर रस्त्यावर

समोरच्या राईतून
किती काळोख दाटला
जसा थकला दिवस
तळापर्यंत गोठला

## २९

सौम्य सोनेरी उन्हाचा
झोतं आला सरकत
गेला गुंतत गुंतत
मंद हिरव्या पानात

निळे धूसर धूसर
धुके तरळत आले
झाड एकामागे एक
त्याने मिठीत घेतले

हलकेच आभाळाला
कुणी फासला गुलाल
गिळावया रंग सारे
आली काळी संध्याकाळ

## ३०

परसात जांभळाचे
झाड उत्तुंग वाढले
गच्च भरल्या पानात
सदा सळसळ चाले

आज सहज पाहता
कळे झालेला फरक
कृश जाहला जांभूळ
पाने गळून कित्येक

पडे पायाशी पाचोळा
दिनभर रातभर
जशी फेकलीत त्याने
वस्त्रे जीर्ण झाल्यावर

## ३१

वारा भन्नाट सुटला
दडी बैसली कानात
तेव्हा खिडकीसमोर
आला पारवा घुमत

थंडी वाढली केवढी
गात्रे चालली गोठून
गेला घुमून घुमून
निळा पारवा निघून

## ३२

किती दिसांनी पाखरा
माझ्या आलास बागेत
अशा बोचऱ्या थंडीत
कुठे होतास हिंडत

आवडत्या फांदीवर
किती किती नाचशील
गा गा लाडक्या पाखरा
माझ्या ओळखीची शीळ

३३

आज दुपारपासून
ढग आलेले भरून
हिवाळ्यात पावसाळा
आला वाट की चुकून

आला वारा गेला वारा
धूळ सारी झाली शांत
पुन्हा थंडीच्या सोबत
जग झोपले निवांत

# ऋतुचित्र

## वसंतातील कविता

# वसंतातील कविता

१. चार भिंतींच्या आतून
२. संपला हिवाळा तरी
३. मावळता मावळता
४. रंध्रारंध्रात झाडाच्या
५. हळु हळु संध्याकाळ
६. उष्ण हवेला घातली
७. वाट चालताना पाय
८. केवढी ही कबूतरे
९. ऊन तापता वेलीला
१०. देठ पिवळ्या पानांचे
११. एका साध्याच झाडाला
१२. पांगाऱ्याच्या फुलामध्ये
१३. नकळत पाहिले मी
१४. अति मृदुल मृदुल
१५. शिंपताना हिरवळ
१६. रस्ता गेला दूर दूर
१७. घमघमला सुगंध
१८. किती उष्णता हवेत
१९. एक पानही हलेना
२०. पौर्णिमा होऊन गेली
२१. दिनभर लाही लाही
२२. ऊन टळले तरीही
२३. कुणी किसून रेशीम
२४. बाहव्याच्या झाडावर
२५. आज सकाळच्या वेळी
२६. काळे मखमली अंग
२७. गुणगुणत आलेल्या
२८. वृक्ष बुडूनिया गेला
२९. मधुमालती लाजरी
३०. पाहताना गुलमोहर



१

चार भिंतींच्या आतून
झळ भासते अंगाला
भुई तापते बाहेर
उभा समोर उन्हाळा

हळु हळु नकळत
वारे वाहता थांबले
सकाळचे ऊन जसे
भट्टीतून तापलेले

सैरावैरा कबूतरे
कशी उडती भरारा
आपुल्याच पंखातून
आपणास घेती वारा

## २

संपला हिवाळा तरी
अद्यापीही डेरेदार
बदामाचा वृक्ष पहा
कसा उभा डौलदार

रंग पिकल्या पानांचा
नव्या पालवीचा लाल
समजून वासंतिक
कुणी सहज फसेल

३

मावळता मावळता
सूर्य विझून चालला
काळ्या मेघांच्या राशीने
तया गिळून घेतला

राख माखून अंगाला
बसे आकाश अभद्र
काळवंडला धुराने
जसा उदास समुद्र

झाला दिनान्त जाणून
अश्रू दाटले डोळ्यात
उष्ण वाऱ्याच्या धगीने
तेही सुकले क्षणात

४

रंध्रारंध्रात झाडाच्या
कळी फुलूनीया आली
अशी फुले अशी फुले
फांदी फांदी डवरली

उलटता दीस काही
उभे झाड तरारले
हाय... पेटत्या उन्हात
कधी अर्धे करपले

५

हळू हळू संध्याकाळ
शिरे रात्रीच्या कुशीत
वाहे टाकून उष्णता
वारा शीतल प्रशांत

वरी सहज पाहता
दिसे चंद्र पूर्णावला
वाट काटून केवढी
किती नजीक पातला

## ६

उष्ण हवेला घातली
कुणी शीतल फुंकर
आज पहाटेपासून
झाले आभाळ धूसर

मंद निखाऱ्यासारखी
भासे धुगधुगी फक्त
सकाळीच पूर्वेवर
जसा जाहला सूर्यास्त

## ७

वाट चालताना पाय
नकळत थबकले
गंध धुंद रानवट
अकस्मात दरवळे

लाल चांदण्यांसारखी
फुले लहडली लाख
वृक्ष अनोळखी तरी
त्याची पटली ओळख

गाड्या रस्ते इमारती
लुप्त झाल्या क्षणार्धात
रोमांचित उभी जशी
घनदाट अरण्यात

## ८

केवढी ही कबूतरे
घेती भरारी उन्हात
जणु एकाने उडावे
तशी एकाच दमात

उतरता सावलीत
पुन्हा वेगळी होतात
आपुल्यात आत आत
सुटी सुटी घुमतात

१

ऊन तापता वेलीला
फुटे फुलांचा उमाळा
रंग उत्तेजक किती
किती सुरेख जांभळा

तेज फुलांचे उन्हात
जसे जातसे उतून
टळू लागता दुपार
साज ठेवीती काढून

भासे वेल ओकीबोकी
संध्याकाळी काळोखात
किती आश्चर्य... सकाळी
फुले तशश्याच तोऱ्यात

## १०

देठ पिवळ्या पानांचे
नाही अजून तुटले
पांगाऱ्याच्या बनातून
रंग वेगळे वेगळे

गर्भरेशमी पालवी
कुठे कुठे तरारली
गालिच्यात वीण जशी
दाट पोपटी गुंफली

प्रगटल्या आताशीच
कुठे कुठे थोड्या कळ्या
लाल फुलांच्या धगीत
कुठे फांद्या पेटलेल्या

नाही फुले नाही पाने
कुठे तरी एखादेच
सांभाळीत काटेकुटे
उभे झाड एकलेच

## ११

एका साध्याच झाडाला
फुले यावया लागली
शुभ्र इवली इवली
आत मधाने दाटली

एक फुलांच्या भाराने
फांदी जराशी झुकली
दोन बैसता चिमण्या
थोडी आणखी वाकली



## १२

पांगाऱ्याच्या फुलांमध्ये
मध आकंठ दाटला
शोध काढीत काढीत
आला एकेक कावळा

कण वेचताना चोच
झाली त्याची हळुवार
वसंतात कावळ्याची
जडे प्रीती फुलावर

**१३**

नकळत पाहिले मी
जरा खिडकीबाहेर
एका आंब्याच्या फांदीला
दिसे आलेला मोहर

दिसताच झाले कशी
रोमांचित अंगभर
जणु भेटला साजण
दीर्घ विरहानंतर

## १४

अति मृदुल मृदुल
नवी पोपटी पालवी
कुरवाळीत पानांना
वारा हळुच हालवी

दाट केवढी वाढली
किती कोमल हळवी
जशी आली अगणित
फुले झाडांना हिरवी

## १५

शिंपताना हिरवळ
पाणी वहात राहिले
कुठे साचून जाहले
तळे सुंदर सावळे

झळ लागता उन्हाची
तहानले...व्याकुळले
कलकलत कावळे
तळ्यापाशी उतरले

थोडी भागता तहान
क्रीडा करीती जळात
टपटप पंखातून
किती मोती सांडतात

विसरून भान सारे
तळ्यामध्ये डुंबतात
जसे दिव्य मानसीचे
राजहंस पोहतात

## १६

रस्ता गेला दूरदूर
झाडे दुतर्फा लागली
पसरली वाटभर
त्यांची विपुल सावली

ऋतू वसंत म्हणून
झाड झाड पल्लवित
जशी प्रत्येक पानात
तेवतसे दिव्य ज्योत

कुठे गुलाबी पोपटी
कुठे दाटला हरित
एक पालवी परंतु
रंग केवढे अनंत

रंग देखता देखता
डोळे आलेत भरून
झुलू लागली पालवी
अंग प्रत्यंगामधून

## १७

घमघमला सुगंध
आला परंतु कुठून
अहा ! केवढी ही झाडे
पूर्ण गेली मोहरून

गंध कुणाचा कोठला
कसा बाई ओळखावा
एका दमात सारीच
फुले लागली फुलाया

## १८

किती उष्णता हवेत
रात मध्यान्हीला आली
कुठे कुठे आभाळात
अभ्रे काळी दाटलेली

वारा जरा न वाहतो
सारखी ही उलघाल
घडी घडी चमकते
तशातून वीज लाल

## ११

एक पानही हलेना
हवा जडावली जशी
एक व्याकुळ चिमणी
चिवचिवते दाराशी

सुख वाटेना जिवाला
काही केल्या काही केल्या
सांजवेळेस सादल्या
दूर दूर लोपलेल्या

अकस्मात आकाशात
एक चांदणी हासली
तिच्या सौम्य निळाईने
गार फुंकर घातली

२०

पौर्णिमा होऊन गेली
आज चार दीस झाले
अर्धी रात्र उलटता
चंद्रदर्शन घडले

जरी चंद्र गोलाकार
कड एक पुसलेली
जशी काच तापूनीया
कोपऱ्यात तडकली

## २१

दिनभर लाही लाही
अंग सारे घामेजले
उतरता सूर्य खाली
मन जसे कोमेजले

हाकारून एकमेका
आणि करून आक्रोश
कावळे हे एक एक
पांगलेले सावकाश

अंधारले सभोवती
कुणी नाही आसपास
एक लाजरी झुळुक
गेली स्पर्शून अंगास

२२

ऊन टळले तरीही
तापलेली संध्याकाळ
जाईजुई मोगरीचा
दरवळे परिमळ

कोण गेले जवळून
फुले केसात माळून
उमटली शिरशिरी
हवा दाहक असून

## २३

कुणी किसून रेशीम
चुरा फेकला वरून
तशी घडी घडी खाली
फुले पडती गळून

फुले नाजूक इवली
शुभ्र कडेला गुलाबी
गंध थोडा थोडा कडू
आणि थोडासा शराबी

सडा सांडला केवढा
केला फुलांनी कहर
वाटे खाली मुळांनाही
येऊ लागला बहर

## २४

बाहव्याच्या झाडावर
पीक हळदीला आले
धम्म पिवळी पिवळी
त्याला अगणित फुले

कुणी रेशीम गुलाबी
पिंजले शिरीषावर
फुलपाखरांसोबत
आले गुंजत भ्रमर

कुठे बोगनवेलीला
लाल फुलांचा बहर
किती फुले किती फुले
नाही ठरत नजर

हिंडताना रस्त्यावर
फुले भेटती अनंत
आणि देतो आलिंगन
स्पर्शावाचून वसंत

## २५

आज सकाळच्या वेळी
ढग आलेत भरून
हवा आधीच कोमट
गेले शरीर उबून

जरी चिन्हे पावसाची
पडे दूर कुठेतरी
तीव्र करून उन्हाळा
गेल्या निघूनीया सरी

## २६

काळे मखमली अंग
शुभ्र रेषा पंखावर
हले शेपूट सारखी
दिसे पाखरु सुंदर

फुटू लागता पहाट
चिवचिवे वेड्यापरी
जसा घुमवीतो कान्हा
गोड सुरेल बासरी

असे स्वर्गीय गायन
कधी नव्हते ऐकले
भेट धाडिली अपूर्व
आज वसंत ऋतूने

## २७

गुणगुणत आलेल्या
कुठूनश्या कुठूनश्या
टिंबाएवढ्या नाजूक
अगणित मधमाश्या

वृक्ष फुलला समग्र
वेढा दिधला तयाला
रुंजी घालीत घालीत
पूर्ण पादाक्रांत केला

असे एकही न फूल
ज्याला भेटली न माशी
मधु वेचता वेचता
स्वतः राहिली उपाशी

## २८

वृक्ष बुडूनीया गेला
पार फुलांच्या राशीत
कधी कळले न त्यांचे
झाले निर्माल्य मातीत

एका एका फुलामागे
एक एक शेंग आली
पुन्हा पहिल्यासारखी
फांदी फांदी भारावली

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६५
क्रमांक २५०३८
३०।५।८

२९

मधुमालती लाजरी
लागे आताशी फुलाया
कुठे कुठे पानांआड
कळ्या लागल्या दिसाया

हळु हळु सर्व कळ्या
उमलत राहतील
लाल गुलाबी फुलांचे
घोस किती लोंबतील

फुले आहेत भाबडी
फुलतील तोपर्यंत
पावसाळी वादळात
नाश होईतोपर्यंत

REFBK-0025919

REFBK-0025919

३०

पाहताना गुल्मोहर
जवळून वा दुरून
झरू लागते आतून
दुःख एक सनातन

किती झाडे बहरली
किती उमलली फुले
आता साऱ्यांच्या शेवटी
ह्याने शस्त्र उपसले

कुणी म्हणोत याजला
जणु ज्वाळा जंगलाची
वा वाहत्या जखमेची
दिसो कुणा लाली याची

ह्याच्या तांबड्या छायेत
डोळे आलेत भरून
ऋतू वसंत धरेला
आता चालला सोडून